T.P. - D.G. SIR (Legal) 2021


# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

**जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : mbmc.tp@gmail.com**


---

**जा.क्र :- मनपा/नर/** 3845/2020-21. **दिनांक :-** 15/2/2021

प्रति,
विभाग प्रमुख
नागरी सुविधा केंद्र (सिस्टीम मॅनेजर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- नगररचना विभागाची माहिती वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत.
संदर्भ :- आपला दि.18/01/2021 रोजीचा जीमेल.

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्रान्वये आपण अपेक्षिलेली नगररचना विभागाची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

मिरा भाईंदर शहराचे क्षेत्र ७९.४० चौ. कि.मी. असून १९ महसुली गावांचा समावेश आहे.मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या महसुली गावासाठी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" यांनी तयार करण्यात आलेली विकास योजना (वगळलेला भाग सोडून) मा. शासनाने दि.13/05/2013 अन्वये मंजूर केलेली आहे. तसेच वगळलेल्या भागासाठी दि.03/06/2016 रोजी मंजुरी आहे.

मिरा भाईंदर क्षेत्रासह इतर शहरांसाठी मा. शासनाने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली शासन निर्णय क्र.टिपीएस-1818/प्रक्र.236/18/वियो.व प्रायो./कलम 37(1कक)(ग) व कलम 20(4)/ नवि-13 दि.02/12/2020 पासून लागु केलेली आहे.

नगररचना विभागामध्ये 22 कर्मचारी असून तांत्रिकपदे 09 व अतांत्रिकपदे 05 आहेत. सध्या कार्यरत, प्र. सहा. नगररचनाकार - 01, कनिष्ठ अभियंता - 04, मुख्य सर्व्हेअर , सर्व्हेअर , अनुरेखक प्रत्येकी 01 व वरिष्ठ लिपिक / लिपिक – 05 आहेत.

**काम काजाचे स्वरूप**

- नवीन / सुधारित/ पुर्न:विकास बांधकाम प्रस्ताव छाननी
- जोत्याचा दाखला,
- भोगवटा दाखला छाननी
- विकास योजनेतील आरक्षणातील जागा विकास हक्क प्रमाणपत्र देऊन ताब्यात घेणे.
- विकास योजनेतील आरक्षणाखाली जागा, भुसंपादन करण्यासाठी प्रस्ताव तयार करणे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

**जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : mbmc.tp@gmail.com**


- महानगरपालिका विभागातील जागेचा झोन दाखला देणे, भाग नकाशा देणे, जमीन मोजणी साठी नाहरकत प्रमाणपत्र देणे, विकास योजनेबाबत अभिप्राय देणे.
- जागेवर कुंपणभिंत लावणेसाठी परवानगी देणे.
- निवासी इमारतीवर पावसाळा कालावधीसाठी वेदरशेड परवानगी देणे.
- शासकीय जागा मागणी प्रस्ताव तयार करणे.
- महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार करावयाची इतर विविध कामे.
- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार करावयाची विविध कामे.
- महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत प्रभाग अधिकारी यांना बांधकामाची माहिती / तपशील देणे व मार्गदर्शन करणे.
- न्यायालयीन प्रकरणात विधी विभागास माहिती पुरविणे व आवश्यक असलेल्या न्यायालयीन प्रकरणात पाठपुरावा करणे.
- मा. स्थायी समिती, मा. महासभा, इत्यादी विषय निहाय गोषवारा तयार करणे व त्या अनुषंगाने पुढील कामे करणे.
- माहिती अधिकार, अपिलीय अधिकारातील कामे.
- महानगरपालिकेतील इतर विभागातील आलेल्या संदर्भावर अभिप्राय देणे.
- मा. आयुक्त सो. यांनी निर्देशीत केलेले इतर कामे.

वरील नगररचना विभागाची सद्यस्थिती असलेली माहिती व या पत्रासोबत आपल्या विभागाचे मेल :- mbmcitdept@gmail.com यावर दि.31 जानेवारी 2021 पर्यंतची अद्यावत माहिती सोबतच्या तक्त्याप्रमाणे पाठविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | सन |
|---|---|---|
| 1. | परवानगीचा तपशील | सन 2003-04 ते सन 2020-21 (जानेवारी 2021 पर्यंत) |
| 2. | विकास हक्क प्रमाणपत्र | एकूण 606 **(पेन ड्राइव्ह मध्ये)** |
| 3. | ताब्यात आलेल्या आरक्षणाची यादी | जानेवारी 2021 पर्यंत |
| 4. | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वयेचे फेरबदल यादी | जानेवारी 2021 पर्यंत |

तरी सर्व माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे असून त्यावर त्वरीत कार्यवाही करणेत यावी.

**(दिलीप घेवारे)**
**प्र. सहाय्यक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**